# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 11/02/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

<u>प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ</u> :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

## भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

## भाग २ - रजा

## भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

## भाग ४ - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र.:डीपी/३१-बी -२ /पोका १२७७ राजेश /अं.आ/ 1904 /२०२० यवतमाळ दिनांक 11 FEB 2020

## अंतीम आदेश

कसूरदार :- पोका/१२७७ राजेश पानसे पो.स्टे.राळेगाव

कसूरी :-

आपण पो.स्टे.राळेगाव येथे दि.२९/६/२०१८ पासुन नेमणुकीस असुन दि.२५/१०/२०१९ पासुन ते दि.२४/११/२०१९ पर्यंत एकुण ३१ दिवस वरीष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावर अनधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर होते.

तसेच आपण अतिशय दारु पिण्याचे सवयीचे असुन राळेगाव माध्ये दारु पिवुन फिरतात.त्यामुळे जनमाणसात पोलीसांची प्रतिमा मलीन होत आहे.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यातील बेजबाबदारपणा व गैरहजर कसुरीबाबत आपणांस क्र.डीपी / ३१ -बी - २ / पोका १२७७ पानसे/कसुरी/१४२४७/२०१९ यवतमाळ दि.१७/१२/२०१९ नुसार **' दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती ' (अपरीणामकारक )** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी ही एक संधी देवुन व शिक्षा कमी करुन प्रस्तावित कादानो मध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोका/१२७७ राजेश पानसे** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' एक महीन्याचे मुळ वेतनाइतका '** आर्थिक दंड ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यर्थीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(नूरुल हसन) भा.पो.से.
प्र.पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

प्रति,

पोका/१२७७ राजेश पानसे मार्फत - ठाणेदार, पो.स्टे.राळेगाव

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह नावानिशी स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास पाठवावी.

प्रत :- वेतन लिपीक -१/ कर्म.आस्थापना लिपीक / सआली ३/डीपीजी लिपीक/ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

क्र :- पोअय/प्रलि/८०-सी/सेवाअंतर्गत प्रशिक्षण खर्च-२०२०-२१/ 1907 /२०२० यवतमाळ, दिनांक :- 11 FEB 2020

**आदेश**

मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रशि-४/सेवांतर्गत प्रशिक्षण/सपोनि/४०८/३१८/२०१९, दि./०१/२०२०, रोजीचे पत्रास अनुसरुन मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे पत्र क्र.अप/कक्ष-४ब/सपोनि/पदोन्नती प्रशिक्षण/सत्र-१५/२०२०/५६८, दि.०४/०२/२०२० अन्वये **पोलीस उप निरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती झालेल्या पोलीस अधिकारी यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण (१५ वे सत्र) दिनांक १७/०२/२०२० ते २९/०२/२०२० (१३ दिवसीय वर्कशॉप)** या कालावधीत **संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक** येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षणाकरिता या आस्थापनेवरील खालील नमूद ०२ पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात आलेली आहे. १३ दिवसीय प्रशिक्षणाची फि प्रती दिवस प्रती प्रशिक्षणार्थी रु.२०००/- प्रमाणे दोन प्रशिक्षणार्थी ची एकूण रु.५२०००/- इतकी आहे. तातडीची बाब म्हणून वरील नमूद प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण शुल्क **रु.५२,०००/-** (रु.बावन हजार फक्त) तात्पुरते घटक पोलीस कल्याण निधीतून मंजूर करण्यात येत असून सदर रक्कम प्रशिक्षणाचे ठिकाणी भरण्यात यावी.

**प्रशिक्षण सत्राचा तपशिल :-**

| अ. क्र. | प्रशिक्षणाचा विषय | प्रशिक्षणाचा कालावधी व ठिकाण | प्रशिक्षणाकरिता निवडलेले पोलीस अधिकारी यांचे नांव/हुद्दा | प्रशिक्षण फि ची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण **(१३ दिवसीय दिवसीय वर्कशॉप)** | **दिनांक १७/०२/२०२० ते २९/०२/२०२० संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक** | **सपोनि/ बालाजी केरबा शेंगेपल्लु , पोस्टे. महागांव** | २६०००/- (रु.सव्वीस हजार फक्त) |
| २. | सहायक पोलीस निरीक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण **(१३ दिवसीय दिवसीय वर्कशॉप)** | **दिनांक १७/०२/२०२० ते २९/०२/२०२० संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक** | **सपोनि/ प्रविण अरूणराव लिंगाडे, पो.स्टे.दारव्हा** | २६०००/- (रु.सव्वीस हजार फक्त) |
| | | | | **एकूण :-रु.५२०००/-** |

सदरचे प्रशिक्षणाची **प्रशिक्षण फि रक्कम रु.५२,०००/- (रु.बावन हजार फक्त) बाब क्रमांक २८ व्यावसायीक सेवा व विशेष सेवा प्रदाने** या शिर्षाखाली मंजूर करण्यात येत आहे.

सदरचा खर्च २०५५ पोलीस १०९ जिल्हा पोलीस दल (००)(०१) जिल्हा पोलीस दल २८ व्यावसायीक व विशेष सेवा प्रदाने या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२०२१ करिता मंजूर अनुदानातून भागविण्यात येत आहे.

(नूरूल हसन,भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति:-** आकस्मिक खर्च लिपिक (२ प्रती)/रोखपाल, पो.अ.कार्यालय.
प्रत :- जिल्हा पोलीस राजपत्र लिपिक यांना आवश्यक कार्यवाहीकरिता.
प्रत :- आकस्मिक खर्च लिपिक/रोखपाल, पो.अ.कार्यालय
**देयक पारित झाल्यानंतर वरील नमूद केलेले प्रशिक्षणाचे शुल्क रक्कम रु.५२०००/- (रु.बावन हजार फक्त) घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करावे.**